महाराष्ट्र टाइम्स, बुधवार, १८ मे, २०११ पृष्ठ क्र.१०

# मालोजीराजे पुरस्कार नारळीकर यांना प्रदान

**म. टा. वृत्तसेवा, सातारा**



श्रीमंत मालोजीराजे स्मृती पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. श्रीमंत मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान आणि श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक यांच्या वतीने हा पुरस्कार देण्यात येतो. जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे) रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या हस्ते नारळीकर यांचा सन्मान करण्यात आला.

आमदार दीपक चव्हाण, नारळीकर यांच्या पत्नी मंगला उपस्थित होते. अकरा हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

श्रीमंत मालोजीराजे राजेसाहेबांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्काराने आपल्याला आनंद झाला आहे. यापूर्वी आपल्याला अनेक पुरस्कार मिळाले. तथापि एका कर्तृत्ववान आणि समाजहितेषी राजाच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्काराने आपला सर्वश्रेष्ठ गौरव झाल्याची भावना नारळीकर यांनी व्यक्त केली. शालेय जीवनापासून इतिहास भूखोल या विषयांऐवजी गणिताला प्राधान्य दिले. त्यापेक्षा गणित हा विषय आव्हानात्मक असून, त्याची आपल्याला खूप आवड आहे. गणितातील सर्वश्रेष्ठ शिक्षण घेण्याचा आपण देश-परदेशात प्रयत्न केल्याचे डॉ. नारळीकर म्हणाले. श्रीराम साखर कारखान्याचे चेअरमन श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात यशवंतराव रणवरे यांनी श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला.